
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई ■ वर्ष १ ■ अंक १६ ■ शुक्रवार, दि. १९ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/ 26 /A4530 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# गुन्हेगार कोणीही असो, वाचणार नाही....!

## राममंदिरातील देणगी चोरीवर योगी बोलले...!

वृत्तसंस्था १९ जून





**अयोध्या:** राम मंदिरात देणगी चोरीच्या वादामुळे मुख्यमंत्री योगी शुक्रवारी अयोध्येला पोहोचले. योगी म्हणाले- विरोधक रामाचा नारा लावणाऱ्यांवर गोळ्या झाडत होते. त्यांचे दुहेरी चरित्र तर बघा. राम मंदिर बनू नये यासाठी काँग्रेसने पराकाष्ठा केली होती. सर्वोच्च न्यायालयात निर्लज्जपणे म्हटले होते की राम तर अस्तित्वातच नव्हते. तीच काँग्रेस आज अयोध्येबद्दल खूप अस्वस्थ आहे. योगींनी जनसभेला संबोधित करताना म्हटले- सपाचे दुहेरी चरित्र बघा, म्हणते की रामभक्तांचा अपमान झाला आहे. कारसेवकांवर आणि रामभक्तांवर गोळ्या झाडणारे लोक उपदेश द्यायला निघाले आहेत. आम्ही ट्रस्टच्या विनंतीवरून एसआयटी चौकशी बसवली. एसआयटी दूध का दूध आणि पाणी का पाणी करून दाखवेल (सत्य बाहेर आणेल). मी सर्वांना सांगेन की कोणीही अनावश्यक टिप्पणी करू नये, ज्यामुळे रामभक्तांना दुःख होईल.

योगी म्हणाले- जर कोणाकडे काही पुरावा असेल तर तो एसआयटीला द्यावा. रामभक्तांना आवाहन आहे की, प्रभू श्रीरामांनी मर्यादेचा पाठ शिकवला आहे. ५०० वर्षांपर्यंत राम मंदिरासाठी संघर्ष केला. आणखी १५ दिवस वाट पहा, प्रतीक्षा करा. काळजी करू नका. अयोध्येला बदनाम करणाऱ्यांच्या भूलथापांना बळी पडू नका. या पवित्र स्थळाला बदनाम करू नका. जर कोणी गुन्हेगार असेल, तो कोणीही असो, तो वाचणार नाही, हे निश्चित आहे. सपा सरकारमध्ये मंत्री राहिलेले पवन पांडे यांनी रविवार, ७ जून रोजी दावा केला होता की, राम मंदिरातून ५ ते ७.५ कोटी रुपयांपर्यंतची चोरी झाली आहे. अखिलेश यांनीही म्हटले होते की, या प्रकरणी सरकारचे मौन संशयास्पद आहे. न्यायालयाने या प्रकरणाची दखल घ्यावी. चंपत राय यांनी स्पष्टीकरण दिले होते की, अद्याप अशी कोणतीही गोष्ट समोर आलेली नाही. वाद वाढल्यावर भाजप नेते डॉ. रजनीश सिंह यांनी ९ जून रोजी पंतप्रधानांना पत्र लिहून सीबीआय चौकशीची मागणी केली. दुसऱ्या दिवशी म्हणजेच १० जून रोजी पंतप्रधान कार्यालयाने मंदिर ट्रस्टकडून या प्रकरणाचा अहवाल मागवला.

चढ्या चोरी प्रकरणात आतापर्यंत ५ लोकांची नावे समोर आली आहेत - लवकुश, अवनीश, अनुकल्प, करुणे आणि रामशंकर उर्फ टिन्नू. या लोकांच्या माहितीनुसार आतापर्यंत २ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. हे सर्वजण देणगीच्या रकमेच्या मोजणीच्या कामाशी संबंधित आहेत. मंदिर ट्रस्टचे कर्मचारी रामशंकर यादव उर्फ टिन्नू यांच्या घरातून १३ जून रोजी सोने सापडले. मात्र, सोन्याचे प्रमाण किती आहे, हे अद्याप निश्चित झालेले नाही.

## २४ जूननंतर महाराष्ट्रात होणार मान्सून सक्रिय!

प्रतिनिधी १९ जून

**मुंबई :** ८ जून रोजी दक्षिण कोकण आणि लगतच्या दक्षिण मध्य महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला होता. साधारणपणे १० ते १५ जूनदरम्यान राज्याच्या बहुतांश भागात पावसाला सुरुवात होणे अपेक्षित होते. मात्र, १८ जूनपर्यंत मान्सून कोकण पट्ट्यातच रेंगाळल्याचे चित्र दिसून आले. आता भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २४ ते २५ जूनपासून महाराष्ट्रात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. विशेषतः कोकण किनारपट्टी आणि मुंबईत पावसाचा जोर वाढण्याचे संकेत आहेत. याशिवाय २५ ते २८ जूनदरम्यान किनारपट्टी भागात अतिवृष्टीचे ढग सक्रिय होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## पेढेवाले, डेअरीवाले, फुडवाले अडचणीत

### पनीर, दूध आणि तुपाचे नमुने ठरले असुरक्षित व अप्रमाणित

प्रतिनिधी १९ जून



**अकोला:** तुम्ही ज्या पेढेवाल्याकडे, डेअरीवाल्यांकडे आणि फुडवाल्यांकडे अगदी चविष्ठ पदार्थ असतात असे सांगत काही खातात त्यांच्याकडे अन्न व औषध प्रशासनाने टाकलेल्या धाडीत पनीर कसे बनावट होते, दुध कसे भेसळयुक्त होते, तळणासाठी वापरलेले तेल कसे प्रदूषित होते यांच्या सुरस कथा समोर आल्या आहे. या सर्व गोष्टींची माहिती जर समोर आली तर तुमच्या घशाखाली एक घास पण जाणार नाही. एकूणच काय तर अनसेफ कॅटेगिरीतील पदार्थ अकोलेकरांना किती दिवस खाऊ घातले जातील असा प्रश्न विचारला जात आहे.

अकोला जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाने अन्नपदार्थांच्या सुरक्षेबाबत अत्यंत गंभीर पाऊल उचलले आहे. मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, अन्न सुरक्षा अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासन नागपूर प्रयोगशाळेच्या अहवालानंतर जिल्ह्यातील नामांकित अन्नपदार्थांचे नमुने मानकांपेक्षा अत्यंत निकृष्ट, अप्रमाणित आणि मानवी आरोग्यासाठी असुरक्षित असल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी प्रशासनाकडून दंडात्मक आणि न्यायालयीन खटले भरण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. तपासणीत आढळून आले की, पनीरच्या विविध नमुन्यांमध्ये दुधाची चरबी अत्यंत कमी प्रमाणात होती. तसेच पनीरमध्ये परदेशी फॅट ची भेसळ असल्याचे समोर आले असून, हे नमुने 'असुरक्षित' व 'अप्रमाणित' घोषित करण्यात आले आहेत.

मिक्स मिल्क, पाश्चराईज्ड स्टँडर्डाईज्ड मिल्क आणि म्हशीच्या दुधात फॅटचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा कमी आढळले. तसेच खव्याचा नमुनाही निकृष्ट आणि असुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले आहे. रिफाइंड पामोलिन तेल आणि भुईमूग तेलाचे नमुने अन्न सुरक्षा कायदा २००६ च्या मानकांवर अपयशी ठरले. खटाई या तयार अन्नपदार्थात यांसारख्या मानवी शरीराला घातक ठरणाऱ्या कृत्रिम अन्न रंगांचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त आढळले आहे. तपासणी अहवालानंतर अन्न व औषध प्रशासनाने दोषींवर कडक कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला आहे. अनेक गंभीर प्रकरणांमध्ये थेट खटले दाखल करण्यात आले असून, सध्या हे खटले प्रलंबित आहेत.

## मुंबई थांबली..! बेस्ट कर्मचाऱ्यांच्या संपामुळे लाखो प्रवासी अडचणीत!

प्रतिनिधी १९ जून

**बृहन्मुंबई :** विद्युत पुरवठा आणि परिवहन कर्मचाऱ्यांच्या संयुक्त कृती समितीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी गुरूवारी मध्यरात्रीपासून अनिश्चितकालीन संप पुकारला आहे. या संपामुळे मुंबईतील बेस्ट बस सेवा मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली असून, लाखो प्रवाशांना त्याचा फटका बसत आहे. संपाच्या पार्श्वभूमीवर आज सकाळपासून मुंबईतील बहुतांश मार्गांवर बेस्ट बस सेवा बंद असल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे कामावर आणि शाळा-कॉलेजांकडे जाणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे. दादर, घाटकोपर, कुर्ला, अंधेरी यांसारख्या प्रमुख रेल्वे स्थानकांबाहेर प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. टॅक्सी आणि रिक्षांसाठीही लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र होते. बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीने सांगितले की, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत प्रशासनाला वारंवार निवेदने देण्यात आली होती. मात्र, त्यावर कोणताही ठोस निर्णय न झाल्याने संपाचा निर्णय घ्यावा लागला.

दरम्यान, मुंबईत दररोज सुमारे २५ लाख प्रवासी बेस्ट बससेवेचा वापर करतात. तसेच बेस्टकडून सुमारे १० लाख ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो.

## अकोला मनपाचा मालमत्ता कर वसुलीसाठी ॲक्शन प्लॅन

### नागरिकांसाठी 6 टक्क्यांपर्यंत सवलतीचा लाभ घ्यावा....!

प्रतिनिधी १९ जून

**अकोला :** अकोला महानगरपालिका (मनपा) प्रशासनाने आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठी मालमत्ता कर आणि बाजार परवाना वसुली मोहीम अधिक तीव्र केली आहे. मागील आर्थिक वर्षात उद्दिष्टाच्या तुलनेत केवळ ४१ टक्के कर वसुली झाल्यामुळे, यावर्षी प्रशासनाने सुरुवातीपासूनच कंबर कसली असून नागरिकांसाठी सवलतींची घोषणा केली आहे. तसेच, कर वसुलीचे काम कोणत्याही खाजगी कंपनीला दिले नसून मनपाचे कर्मचारीच हे काम करत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मागील आर्थिक वर्षात मालमत्ता कराचे एकूण २०८ कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यापैकी मनपा कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे प्रत्यक्ष ८५ कोटी रुपयांची कर वसुली करण्यात आली. एकूण उद्दिष्टाच्या तुलनेत हा वसुलीचा आकडा ४१ टक्के इतका भरतो. आर्थिक वर्ष २०२६-२७ ची देयके आणि घरोघरी वाटप सुरु झाले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार सर्व मालमत्तांची कर आकारणी पूर्ण झाली आहे. चालू आर्थिक वर्ष

### वसुलीच्या खाजगीकरणाच्या अफवांवर उप-आयुक्तांचे स्पष्टीकरण

शहरात कर वसुलीचे काम खाजगी कंपनीला देण्यात आल्याच्या चर्चांवर उप-आयुक्तांनी पूर्णविराम दिला आहे. मालमत्ता कराची १०० टक्के वसुली ही अकोला महानगरपालिकेच्या स्वतःच्या कर्मचाऱ्यांमार्फतच पार पाडली जात आहे. नागरिकांनी akolamced.in या अधिकृत पोर्टलवरून ऑनलाइन पद्धतीने किंवा झोन कार्यालयांत जाऊन कर भरणा करावा आणि अकोला शहराच्या विकासकामांना गती देण्यासाठी मनपा प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.



२०२६-२०२७ ची मालमत्ता कराची मागणी देयके (बिल) जनरेट करण्यात आली आहेत. मनपा कर्मचाऱ्यांमार्फत शहरात घरोघरी जाऊन या देयकांचे वाटप सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. ज्या मालमत्ताधारकांना ऑनलाइन सुविधेचा वापर करता येत नाही.

त्यांनी कार्यालयीन वेळेत अकोला मनपा मुख्यालय किंवा पूर्व-पश्चिम, उत्तर व दक्षिण झोन कार्यालयातून आपली देयके प्राप्त करून घ्यावीत.

## 'आरटीआय'; केंद्राला एक अन् राज्याला दुसरा नियम!

प्रतिनिधी १९ जून



**नागपूर :** माहिती अधिकार कायदा (आरटीआय) २००५ देशभर लागू असताना राज्याच्या नव्या 'आरटीआय' नियमांमधील अनेक तरतुदी केंद्राच्या कायदा व नियमांपेक्षा कठोर आहेत. 'आरटीआय'चे नियम देशभर सारखे ठेवावेत, अशी केंद्र सरकारने २०११ मध्ये राज्यांना केलेली विनंतीही महाराष्ट्र सरकारने धुडकावल्याचा आरोप 'असोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स'ने (असरा) केला आहे. केंद्रीय कायद्यानुसार माहिती मागण्याचे कारण विचारता येत नाही. मात्र, महाराष्ट्राच्या नव्या नियमांमध्ये ते बंधनकारक केले आहे. तसेच अर्ज एका विषयापुरता मर्यादित ठेवत १५० शब्दांची अट घालण्यात आली आहे. एका अर्जात अनेक परस्परसंबंधित मुद्दे असल्यास केवळ पहिल्या विषयावर कार्यवाही करून उर्वरित माहितीसाठी स्वतंत्र अर्ज करण्यास सांगितले जाऊ शकते. याउलट 'केंद्रीय आरटीआय नियम २०१२'मध्ये ५०० शब्दांची मर्यादा असून, केवळ शब्दमर्यादा ओलांडल्यामुळे अर्ज फेटाळता येत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

नव्या नियमांनुसार प्रत्येक अर्जाबरोबर स्वप्रमाणित छायाचित्र ओळखपत्र जोडून भारतीय नागरिकत्वाचा पुरावा सादर करणे आणि माहिती का हवी, याचे कारण नमूद करणे बंधनकारक आहे. ही माहिती नसल्यास संबंधित अधिकारी अर्ज परत करू शकतो. नवीन नियमांनुसार एखादी माहिती सरकारी संकेतस्थळावर उपलब्ध असल्यास तिची प्रमाणित प्रत न देता केवळ संकेतस्थळाची 'लिंक' देण्याची मुभा माहिती अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

मात्र, अशा अप्रमाणित प्रतींना न्यायालयीन किंवा विभागीय चौकशीमध्ये अधिकृत पुराव्याचे महत्त्व राहत नसल्याने नागरिकांच्या कायदेशीर लढ्यांवर परिणाम होऊ शकतो, असे संघटनेचे म्हणणे आहे. तसेच सुनावणीसाठी अर्जदार वारंवार अनुपस्थित राहिल्यास अपील फेटाळण्याचा अधिकार राज्य माहिती आयोगाला देण्यात आला आहे. अपीलचा निर्णय उपस्थितीवर नव्हे, तर प्रकरणातील तथ्ये व नोंदींच्या आधारे व्हायला हवा, असे 'असरा'चे म्हणणे आहे.

अर्ज, प्रती आणि अपील शुल्कात वाढ करून राज्य सरकारने माहितीच्या अधिकारावर आर्थिक व प्रशासकीय बंधने घातली आहेत.

## ममता बॅनर्जींना आणखी एक धक्का!

वृत्तसंस्था १९ जून

**कोलकाता :** विधानसभा निवडणुकीत पराभवाच्या खोल गर्तेत फेकल्या गेलेल्या तृणमूल काँग्रेसच्या अडचणींत नित्यनव्याने भर पडत आहे. पक्षनेतृत्वाचा वाद मिटेपर्यंत पक्षाच्या बँक खात्यांतून कोणतेही व्यवहार करण्यास बंदी आणावी आणि ती खाती गोठविण्यात यावी, अशी मागणी पक्षाचे खजिनदार अरूप बिस्वास यांनी पक्षाच्या बँक खात्यांतील व्यवहारांवर बंदी आणून ती गोठविण्यात यावी, अशी मागणी करणारे दोनपानी पत्र खासगी बँकेच्या व्यवस्थापकास लिहिले आहे. पक्षनिधीचा गैरवापर होऊ शकतो, अशी भीती बिस्वास यांनी पत्रात व्यक्त केली आहे. समाज माध्यमांवर या पत्राची मोठी चर्चा सुरू आहे. बिस्वास हे ममता बॅनर्जी गटाचे आमदार आहेत. बंडखोर गटाने जाहीर केलेल्या नव्या कार्यकारिणीतून त्यांची ५ जून रोजी पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यांच्या जागी बंडखोर गटाने माजी खासदार सुभाशिष चक्रवर्ती यांची खजिनदार म्हणून नियुक्ती केली आहे.

## दोन नवे जलमार्ग!

**कल्याण :** वाहतूककोंडीवर पर्याय म्हणून डोंबिवली-ठाणे- मीरा भाईंदर-वसई आणि दुसऱ्या मार्गाने डोंबिवली, दिवा ते नवी मुंबई विमानतळ असे दोन जलमार्ग निश्चित करण्यात आले आहेत. त्यासाठी डोंबिवली मोठागाव येथे सुरू असलेले जेट्टीचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे.

## सोन्याचे भाव कोसळले; महिन्याभरात 23,000 रुपयांनी स्वस्त

प्रतिनिधी १९ जून



**मुंबई :** जागतिक घडामोडींचा परिणाम देशांतर्गत बाजारातील सोनं-चांदीच्या दरांवर होत असून गेल्या महिनाभरात सोने २३,००० ने स्वस्त झाले आहे. तर केवळ चार दिवसांमध्येच सोनं तब्बल ६ हजारांनी स्वस्त झालं आहे.

देशांतर्गत बाजारात गेल्या ४ दिवसांपासून सोन्याच्या भावात घसरण सुरू आहे. त्यातच आज सराफा बाजारात प्रति तोळा तब्बल ३,६५० रुपयांची घसरण झाल्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे सध्या खरेदी करण्याआधी तुमच्या शहरातील सोनं-चांदीचे ताजे भाव काय आहेत हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

सोन्याच्या दरात घसरण पाहायला मिळते. त्यामुळे ग्राहकांना अंदाज येत नाही. बाजारातील स्थिती लक्षात घेऊन व्यवहार करणे संयुक्तिक आहे. सोने चांदीच्या दरात चढ उतार पाहायला मिळतो. खरे तर याला जागतिक परिस्थिती खरेतर कारणीभूत आहे. त्याचा परिणाम दर कमी अधिक होण्यात होतो. बाजारातील परिस्थिती दररोज बदलत असते. मध्यंतरी इराण अमेरिका युद्धामुळे सोने चांदीच्या दरात चढ उतार होत होता. परंतु काही दिवसांपासून भावात बदल होत आहे. सोने चांदीचे दर झपाट्याने वाढत गेले.

**दरांमध्ये चढ-उतार होण्याची मुख्य कारणे :** जागतिक घडामोडी आणि युद्धजन्य परिस्थिती: आंतरराष्ट्रीय पातळीवर राजकीय तणाव किंवा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास गुंतवणूकदार शेअर्सऐवजी सोन्याला सुरक्षित पर्याय मानतात. त्यामुळे सोन्याची मागणी वाढून दर वाढतात.

अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेने व्याजदरात बदल केल्यास त्याचा थेट परिणाम सोन्याच्या किंमतींवर होतो. व्याजदर कमी झाल्यास सोन्याचे दर सहसा वाढतात.

आंतरराष्ट्रीय बाजारात डॉलर मजबूत झाला, तर सोन्याचे भाव वाढतात. डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया कमजोर झाला.

## स्मृती मंधानाने रचला इतिहास..!

### 600 पार चौकार मारणारी पहिली क्रिकेटपटू

प्रतिनिधी १९ जून



**मुंबई :** स्मृती मंधानाने आयसीसी महिला विश्वचषक २०२६ मध्ये आपले सलग दुसरे अर्धशतक झळकावले. पाकिस्तानविरुद्धच्या ६८ धावांच्या खेळीनंतर, तिने बुधवारी ७४ धावांची शानदार खेळी केली. नेदरलँड्सविरुद्धच्या या खेळीत तिने एक षटकार आणि ११ चौकार मारले, ज्यामुळे तिच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत ६०० चौकार पूर्ण झाले. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ६०० चौकार मारणारी ती पहिली क्रिकेटपटू (पुरुष किंवा महिला) आहे. अद्याप कोणत्याही पुरुष क्रिकेटपटूने ५०० चौकारांचा टप्पा गाठलेला नाही, हे विशेष.

बुधवारी झालेल्या भारत विरुद्ध नेदरलँड्स सामन्यात, प्रथम फलंदाजी करताना भारताने २०९ धावा केल्या. टी-२० विश्वचषकात भारताने २०० पेक्षा जास्त धावा करण्याची ही पहिलीच वेळ होती. स्मृती मंधाना आणि शफाली वर्मा यांनी पहिल्या विकेटसाठी ११५ धावांची भागीदारी केली. लक्ष्याचा पाठलाग करताना नेदरलँड्सचा संघ ११४ धावांवर सर्वबाद झाला. भारताने हा सामना ९५ धावांनी जिंकला, धावांच्या बाबतीत टी२० विश्वचषकातील भारताचा हा सर्वात मोठा विजय आहे.

### टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांतील ६०० चौकार

स्मृती मंधानाने या डावात टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील आपला ६०० वा चौकार पूर्ण केला. तिने आतापर्यंत १६८ सामन्यांतील १६२ डावांमध्ये ६०४ चौकार मारले आहेत. या फॉरमॅटमध्ये तिने भारतासाठी १ शतक आणि ३५ अर्धशतकांसह ४४७५ धावा केल्या आहेत. तिने ८८ षटकारही मारले आहेत.

### सर्वाधिक चौकार मारणारे ५ पुरुष क्रिकेटपटू

पाकिस्तानच्या बाबर आझमच्या नावावर टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पुरुष क्रिकेटपटूंमध्ये सर्वाधिक चौकारांचा विक्रम आहे, त्याने १३६ डावांमध्ये ४७७ चौकार मारले आहेत. दुसऱ्या क्रमांकावर आयर्लंडचा पॉल स्टर्लिंग ४४९ तर या यादीत रोहित शर्मा ३८३ चौकारांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. इंग्लंडच्या जोस बटलरने ३७३ चौकार मारीत चौथे स्थान मिळविले तर विराट कोहली ३६९ चौकारासह पाचव्या क्रमांकावर आहे. कोहली आणि रोहित यांनी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.

# सोयाबीन उत्पादकांचे अर्थचक्र बिघडण्याची शक्यता

## पावसा अभावी सोयाबीन पेरणीचे बिघडू लागले नियोजन

प्रतिनिधी १९ जून



**अकोला :** अर्ध्याहून अधिक जून महिना संपला तरी वरुण राजा बरसण्याचे नावच घेत नसल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. रोज आकाशाकडे टकटकी लावून शेतकरी बघत आहेत. परंतु रोजच आकाश निरभ्र दिसत असल्याने व उन्हाचा चटका वाढल्याने काय होणार? कसे होणार? हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. यंदा पावसाचे आगमन लांबल्याने पेरण्याचे नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता अधिक आहे.

जिल्ह्यात अद्याप समाधानकारक पाऊस झाला नसल्याने पेरण्यांना प्रारंभ होऊ शकलेला नाही. सोयाबीन पेरणीचा काळ कोरडा जाऊ लागला आहे. यंदा वार्षिक सरासरीच्या ९० टक्के पाऊस होण्याची व तो सुद्धा खंडित स्वरूपाचा राहणार असल्याने शेतीवरील संकट गडद होऊ लागले आहे. दरम्यान शंभर मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरण्या करू नका असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.

विदर्भात मान्सूनचे आगमन साधारणपणे १५ ते २५ जून दरम्यान होते. परंतु सध्या मान्सूनची वाटचाल थंडावली असल्याने विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्र लाट सुरू आहे. आणि मान्सूनसाठी हवामान खात्याच्या अंदाजानुसार २० जून पर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. जिल्ह्यातील अधिकतर क्षेत्र कोरडवाहू असून पावसाच्या भरोशावर या भागातील शेती अवलंबित आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आणि ज्वारी या भागातील मुख्य पिके असून सोयाबीनच्या पेरणीचा काळ सुरू झाला असला तरी पावसाचे आगमन न झाल्याने मशागत झालेली शेती प्रतीक्षेतच आहे. बियाणे बाजार थंड आहे. शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. पावसाला विलंब होत असल्याने शेतकऱ्यांचे पेरणीचे नियोजन बिघडू लागले असून त्याचा एकूणच परिणाम उत्पादनाच्या सरासरी वर होणार असल्याने शेतकऱ्यांचे अर्थ चक्रही बिघडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या सुधारित अंदाजानुसार व विदर्भाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार यंदा पावसाचे वितरण दोन भागात विभागले जाण्याची शक्यता आहे. पूर्व विदर्भात पावसाचे प्रमाण दीर्घकालीन सरासरीच्या जवळ राहण्याचा अंदाज आहे. तर पश्चिम विदर्भात मान्सून काळात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यातच सोयाबीन पेरणीचा काळ कोरडा जाऊ लागल्याने यंदा सोयाबीनच्या उत्पन्नावर निश्चितच परिणाम होणार असल्याचे जाणकार शेतकरी सांगत आहेत. त्यामुळे यंदा सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे अर्थ चक्र बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## विधान परिषद मतदार संघासाठी ९४.६८ टक्के मतदान



प्रतिनिधी १९ जून

**अमरावती :** गुरुवारी पार पडलेल्या विधानपरिषद मतदारसंघासाठी एकूण ४५३ मतदारांपैकी ४२७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. याची सरासरी टक्केवारी ९४.६८ टक्के झाली आहे.

या निवडणुकीत काँग्रेसच्या मतदारांना तटस्थ राहण्यासाठी सांगण्यात आले होते.

मात्र अमरावती व जिल्हा बाहेर काँग्रेसच्या अनेक नगरसेवकांनी पक्षाचा आदेश झुगारून मतदान केले. मात्र हे नेमके मतदान कोणाला झाले? ये समझनेवाले को इशारा काफी होता है!

अमरावती ११ नगरसेवक, तिवसा १२ नगरसेवक, व दर्यापुरात एक नगरसेवकाने कुणालाही मतदान न करता तटस्थ राहण्याची भूमिका घेतली होती.

तर ४५३ मतदारांमध्ये दर्यापूर व धारणी येथील एका नगरसेवकाचा मृत्यू झाला आहे. ४५१ मतदार होते. त्यापैकी ४२७ मतदान झाले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठान येथे समुपदेशन केंद्र

**अकोला :** खडकी परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठान येथे परिमल प्रतिष्ठान समुपदेशन केंद्र सुरु झाले आहे. समाजातील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांना मानसिक तणावमुक्त व समृद्ध जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, या हेतूने केंद्राला सुरूवात करण्यात आली आहे. समुपदेशन केंद्रामार्फत शैक्षणिक, कौटुंबिक, मानसिक तणाव तसेच वैयक्तिक समस्यांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. समाजातील नागरिकांनी आपल्या समस्यांच्या निराकरणासाठी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## भाजपा सेवानिवृत्त सेल तर्फे सीईओ अनय नावंदर यांचे स्वागत



प्रतिनिधी १९ जून

**अकोला :** अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आज भाजपा सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी सेल तर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. या सेलचे संयोजक सुनील जानोरकर, सहसंयोजक प्रदीप खाडे, सचिव राजेश नेरकर, कोषाध्यक्ष अशोक मांगुळकर यांनी हे स्वागत केले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण विशेष प्रयत्नशील राहू असे आश्वासन याप्रसंगी अनय नावंदर यांनी दिले.

## अट्टल मोटरसायकल चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखा वाशीमकडून अटक, ४ मोटरसायकल जप्त

प्रतिनिधी १९ जून

**वाशीम :** जिल्ह्यातुन मोटारसायकल चोरणाऱ्या अट्टल चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली आहे.आरोपीच्या ताब्यातुन चोरी केलेले ४ मोटरसायकल हस्तगत करण्यात आले असून इतर काही मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

शहर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्याचा तपास करत असतांना पोलिसांना माहीती मिळाली की, धुमका येथील चोरट्याने ही मोटरसायकल चोरून नेली आहे.यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धुमका येथे जावून संशयित इसम उमेश किशन राठोड याला ताब्यात घेतले.त्याला विचारपुस केली असता,त्याने वाशीम, मालेगांव आणि इतर परीसरातुन मोटरसायकल चोरीची कबुली दिली. यावरून आरोपीच्या ताब्यातुन १ लाख ९५ हजार रुपयांच्या किंमतीचे एकूण ४ मोटरसायकल हस्तगत करण्यात आले आहे.या प्रकरणी उमेश राठोडला अटक करण्यात आली आहे.आरोपीला वाशीम शहर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले असून आणखी काही मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव आणि त्यांच्या पथकाने केली.

## माजी उपसरपंच भिमराव दहिभात यांच्यावर अंत्यसंस्कार



**अकोट :** मुंडगाव येथील प्रतिष्ठित शेतकरी तथा माजी उपसरपंच भिमराव मारोती दहिभात (वय ७२) यांचा शेतातील पालापाचोळा जाळताना होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी घडली. या घटनेमुळे मुंडगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

बुधवारी सकाळी ते शेताची पाहणी करण्यासाठी गेले होते. शेतात पडलेला काडीकचरा व पालापाचोळा त्यांनी पेटवून दिला. मात्र त्यानंतर उष्णतेचा त्रास किंवा प्रकृती बिघडल्याने त्यांचा तोल गेला असावा आणि ते पेटलेल्या पालापाचोळ्यात पडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.दरम्यान, बराच वेळ उलटूनही वडील घरी परत न आल्याने त्यांचा मुलगा त्यांना शोधण्यासाठी शेतात गेला. तेव्हा भिमराव दहिभात हे अर्धवट जळालेल्या अवस्थेत पडलेले दिसून आले. ही बाब लक्षात येताच त्याने आरडाओरड केली. गावातील नागरिक घटनास्थळी धावून आले. मात्र तोपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली होती.

## उत्तर झोन मधील अतिक्रमण काढले

प्रतिनिधी १९ जून



**अकोला :** महानगर पालिका उत्तर झोन अंतर्गत अकोट फैल येथील रामदास मठ आणि मारोती मंदीर संस्थानच्या जागेवर गेल्या काही वर्षापासून काही दुकानदार संस्थानच्या जागेवर अतिक्रमीत दुकाने बांधकाम करून संस्थानची जागा गिळंकृत करण्याच्या बेतात होते. यासाठी संस्थान आणि आजु-बाजुच्या नागरिकांनी सदर दुकानांचे अतिक्रमण काढून जागा मोकळी करून देण्यासाठी विनंती केली होती.

या अनुषंगाने मनपा प्रशासनाव्दारा सदर अतिक्रमण धारकांना दुकाना संदर्भातील कागदपत्रे सादर करण्यासाठी सुचना दिली होती, परंतू त्यांनी कोणतेही कागदपत्रे सादर न केल्याने त्यांचे चार दुकानांच्याअतिक्रमणावर आज दि. १८ जून २०२६ रोजी मनपा सहा.आयुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनात तसेच सहा.आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या उपस्थितीत पोलीस बंदोबस्तात निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

याचसोबत आकोट फैल येथील दुकानदारांव्दारे करण्यात आलेले टीनशेड, ओटे, चारचाकी गाड्या आदींचे अतिक्रमणावरसुध्दा कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईत आकोट फैल पोलीस स्टेशनचे ठाणेदार रहीम शेख, कनिष्ठ अभियंता नरेश कोपेकर, पियूष बंगाले, पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर गिते, आलीम काजी, आकोट फैल पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांचेसह झोन कार्यालय येथील कर्मचा-यांचा समावेश होता.

## वडिलांना मारहाण, मुलगा व सुनेविरुद्ध गुन्हा

**खामगाव :** तालुक्यातील पळशी बु. येथील शेतशिवारात असलेल्या गोडाऊनचे कुलूप तोडून सुमारे १८ हजार रुपये किमतीचा गहू चोरून नेल्याप्रकरणी तसेच वृद्ध वडिलांना मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी मुलगा व सुनेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

विलास वामनराव चव्हाण (७१, रा. पळशी बु, ता. खामगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल विलास चव्हाण (४०) व आरती अमोल चव्हाण (३५, दोघेही रा. पळशी बु) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ११५(२), ३५२, ३५१(२)(३) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी यांच्या तक्रारीनुसार, १२ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास पळशी बु, येथील शेतातील गोडाऊनमध्ये साठवून ठेवलेल्या सुमारे ६० क्विंटल गव्हापैकी आरोपी अमोल चव्हाण याने गोडाऊनचे कुलूप तोडून २० कट्टे, अंदाजे १२ क्विंटल गहू चोरून नेला.चोरीस गेलेल्या गव्हाची किंमत सुमारे १८ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. गव्हाबाबत विचारणा केली असता आरोपी अमोल चव्हाण याने फिर्यादींना शिवीगाळ करत चापट-बुक्क्यांनी मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. यावेळी आरोपी आरती चव्हाण हिनेही फिर्यादींना मारहाण करून हात-पाय तोडण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात १८ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास गणेश जाधव करीत आहेत.

## राष्ट्रीय कामगार सेनेचा पदवितरण सोहळा संपन्न



प्रतिनिधी १९ जून

**अकोट :** राष्ट्रीय कामगार सेनेच्या वतीने आयोजित पदवितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात पारेषण व विद्युत वितरण विभागातील सुमारे १४० कामगारांनी शिवसेनेत प्रवेश करत संघटनात्मक बांधिलकी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला लोकसभा संपर्क प्रमुख राजन साळवी उपस्थित होते. प्रमुख उपस्थितीमध्ये विदर्भ प्रवक्ता प्रा. प्रकाश डवले, डॉ. विशाल इंगोले, राष्ट्रीय कामगार सेनेचे विदर्भ प्रमुख आकाश हेरोळे, जिल्हाप्रमुख सतीश इंगळे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख माधुरी वाघमारे, डॉ. गजानन पुंडकर तसेच चंचल पितांबरवाले उपस्थित होते.

यावेळी राजन साळवी व आकाश हेरोळे यांच्या नेतृत्वात तसेच डॉ. विशाल इंगोले यांच्या समन्वयातून पारेषण व विद्युत वितरण विभागातील १४० कामगारांनी शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी मार्गदर्शन करताना राजन साळवी म्हणाले की, कामगारांचे प्रश्न, त्यांचे हक्क व संघटनात्मक बळकटी यासाठी राष्ट्रीय कामगार सेना सातत्याने कार्यरत असून मोठ्या संख्येने झालेला हा पक्षप्रवेश कामगारांचा वाढता विश्वास दर्शवणारा आहे. आगामी काळात कामगारांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे काम केले जाईल, असे त्यांनी सांगितले.प्रा. प्रकाश डवले यांनी आपल्या समयोचित भाषणात संघटनात्मक एकजूट, कामगारांचे प्रश्न आणि सामाजिक बांधिलकी यावर भाष्य करत कार्यकर्त्यांना अधिक सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे संचालन प्रशांत भटकर यांनी केले तर आभार प्रदर्शन चेतन नवले यांनी केले.

## एफडीए कारवाईच्या भीतीने हॉटेल व्यावसायिकांमध्ये खळबळ

**अकोला :** ग्रामीण

एफ डी ए कारवाईच्या भीतीने हॉटेल व्यावसायिकांमध्ये खळबळ

अकोला. शहरात अन्न व औषध प्रशासन अर्थात एफ डी ए कडून सुरू असलेल्या कारवायांच्या पार्श्वभूमीवर हॉटेल व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संभाव्य तपासणी आणि कारवाई टाळण्यासाठी अनेक हॉटेल, रेस्टॉरंट तसेच खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर साफसफाईची मोहीम राबवली जात आहे.

स्वयंपाकगृह, खाद्यपदार्थ साठवणूक विभाग आणि ग्राहकांसाठी असलेल्या जागांची स्वच्छता करण्यात येत असून अन्न सुरक्षा नियमांचे पालन करण्यावर भर दिला जात आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या कारवायांमुळे शहरातील हॉटेल व्यावसायिकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. गेल्या काही दिवसांपासून एफडीए कडून खाद्यपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता आणि अन्न सुरक्षा नियमांची तपासणी केली जात असल्याने अनेक व्यावसायिक सतर्क झाले आहेत.याच पार्श्वभूमीवर शहरातील विविध हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये साफसफाईला वेग आला आहे. स्वयंपाकघरातील भांडी, खाद्यपदार्थ साठवणूक करण्याच्या जागा, फ्रिज, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच ग्राहक बसण्याच्या ठिकाणांची स्वच्छता करण्यात येत आहे.

## नियोजन भवनात आज जिल्हास्तरीय कार्यक्रम

**अकोला :** कर्मचारी भविष्य निधी संघटन विभागीय कार्यालयातर्फे प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ वितरण कार्यक्रम १९ जून रोजी दु. ४ वा. नियोजनभवनात होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत दिल्ली येथे आयोजित राष्ट्रस्तरीय मुख्य कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणही यावेळी केले जाईल. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्यासह अनेक उपस्थित राहतील.

## निधन वार्ता

**नितीन हटकर**



**बार्शीटाकळी :** येथील नितीन बाबुलाल हटकर ४४, यांचे १८ जून रोजी पहाटे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे. कवी प्रवीण हटकर यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

## दुग्धोत्पादनात जिल्हा स्वयंपूर्ण व्हावा, प्रत्येक तालुक्यात क्लस्टर करा; जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत निर्देश

प्रतिनिधी १९ जून



**अकोला :** दुग्धोत्पादनात जिल्हा स्वयंपूर्ण होण्यासाठी चांगली दुधाळ जनावरे, उत्तम वैरण व्यवस्था व दुध उत्पादकांना व्यवसायासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणे आवश्यक आहे. पशुसंवर्धन विभाग व सर्व संबंधित यंत्रणांनी त्यासाठी प्रयत्न करावे, तसेच जिल्हा दुध उत्पादक संघाशी समन्वय ठेवून प्रत्येक तालुक्यात क्लस्टर निर्माण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत देण्यात आले.

मूर्तिजापूरचे आमदार हरिश पिंपळे यांच्या सूचनेनुसार जिल्हा दुध उत्पादक सहकारी संस्था, दुध उत्पादक संस्था, जिल्हा प्रशासन व विविध यंत्रणांची बैठक जिल्हाधिका-यांच्या दालनात झाली. आमदार हरीश पिंपळे, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. सीईओ अनय नावंदर, जिल्हा दुध उत्पादक संघाचे प्रशांत हजारी, शिवा मोहोड, नाना भिसे, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी दे. जा. सोळंके यांच्यासह संघ व संस्थांचे सदस्य, कृषी, नाबार्ड, विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प आदी यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

आमदार श्री. पिंपळे म्हणाले की, जिल्ह्यातील दुध उत्पादक संस्था अडचणीत असून, त्यांचे बळकटीकरण होणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे, ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे दुग्ध उत्पादक संस्थांना वाटप, तसेच वैरण विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. संस्थांचे संपूर्ण दूध संकलन करून संघामार्फत प्रक्रिया व वितरणाची व्यवस्था झाल्यास जिल्ह्यातील दूध स्थानिक स्तरावर उपलब्ध होईल. पशुसंवर्धन, दुग्धविकास, कृषी व सर्व संबंधित विभागांनी संघासोबत समन्वय ठेवावा. दुग्धोत्पादक शेतक-यांना योजनांचा लाभ द्यावा. दुग्धोत्पादकांना प्रक्रिया व व्यवसायासाठी कर्ज मिळण्यास बँकांनी सहकार्य करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पशुसंवर्धन विभागाकडे उपलब्ध आकडेवारीनुसार, जिल्ह्यात प्रजननक्षमता असलेली देशी गाय, संकरित गाय व म्हैस मिळून १ लक्ष १० हजार ५१ जनावरे आहेत. त्यात दुधाळ जनावरे ३४ हजार ७३७ आहेत.

## प्रभाग क्रमांक 4 च्या पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान; प्रशासनाची जय्यत तयारी

वि. प्रतिनिधी १९ जून



**अकोट :** दि. १९ : अकोट नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक ४ मधील रिक्त जागेसाठी उद्या, दि. २० जून २०२६ रोजी पोटनिवडणूक होत असून मतदान प्रक्रियेसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. या निवडणुकीकडे स्थानिक राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून विशेषतः भारतीय जनता पक्षासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात आहे.

प्रभाग क्रमांक ४ मध्ये एकूण ४ हजार ९४९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासनाकडून ५ मतदान केंद्रे (बूथ) उभारण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व शांततेत पार पडावी यासाठी ५ स्वतंत्र पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक कामकाजासाठी सुमारे ७० अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून मतदान साहित्याचे वितरण, सुरक्षा व्यवस्था, मतदारांच्या सोयी-सुविधा तसेच मतदानानंतर मतपेट्या सुरक्षितपणे जमा करण्याबाबत आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

या पोटनिवडणुकीत विविध राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांनी प्रचाराची जोरदार रणधुमाळी केली. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात उमेदवारांनी घरभेटी, कोपरा सभा व मतदारांशी थेट संवाद साधून मतांची जुळवाजुळव केली. त्यामुळे मतदानाचा टक्का वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रभाग क्रमांक ४ मधील ही निवडणूक राजकीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जात असून निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विशेषतः भाजपसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरत असल्याने पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाने प्रचारात मोठी ताकद लावली होती. त्यामुळे मतदारांचा कौल कोणाच्या पारड्यात पडतो, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.प्रशासनाने मतदारांना निर्भयपणे व उत्साहाने मतदान करण्याचे आवाहन केले असून लोकशाहीच्या या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

CHANGE OF NAME
I have changed my old name
MOHD SUZAIN ABDUL RAHEMAN
gagget no- (N-2612488)
new name
ZAIN SHAIKH ABDUL RAHEMAN
-Address-
Mankarna Plot, Near Star Complex, Akola
Mo.No: 9325516720

# सिटी न्यूज अकोला

शुक्रवार दि. १९ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## रविवारी नीट परीक्षा १७ केंद्रांवर, कडेकोट बंदोबस्त

**अकोला :** राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत नीट परीक्षा रविवारी, २१ जून रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६.१५ या वेळेत दु. २ ते सायं. ६.१५ या वेळेत अकोला शहर, मूर्तिजापूर शहर आदी ठिकाणी एकूण १७ केंद्रांवर होणार आहे.

परीक्षा केंद्रात इतर व्यक्ती, प्रसारमाध्यमे, तसेच परीक्षा प्रक्रियेशी थेट संबंधित नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला प्रवेश करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

## शिवदास वाहूरवाघ यांच्या उपोषणाची सांगता

### प्रशासनाच्या आश्वासनानंतर उपोषण मागे



प्रतिनिधी १९ जून

**अकोला :** घरकुल योजनेचा लाभ मिळत नाही म्हणून शिवदास उत्तमराव वाहू वाघ यांनी १६ जून पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. प्रशासनाने त्यांच्या मागण्या मान्य करीत त्यांना आश्वासन दिल्यानंतर त्यांनी आमरण पोषण मागे घेतले.

जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील राहीत येथील शिवदास उत्तमराव वाहूरवाघ यांनी सौ. रंजना शिवदास वाहुरवाघ यांना घरकुल योजनेचा लाभ अद्याप मिळाला नसल्याने आमरण उपोषण सुरू केले होते. रंजना शिवदास वाघ यांना नियम दाखवून त्यांना घरकुलाचा लाभ अद्याप देण्यात आला नाही. याबाबत शिवदास वाहूरवाघ यांनी १६ जून पासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू केले होते. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी रेटून धरली होती. त्यांच्या मागणीची दखल घेत आज सदर प्रकरणाची चौकशी करून दोशींवर कारवाई करण्यात येईल अशी आश्वासन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी शिवदास उत्तमराव वाहूरवाघ यांना दिल्यानंतर त्यांनी आज आमरण उपोषण मागे घेतले, यावेळी सहाय्यक प्रशासन अधिकारी दिलीप शिरसाठ, विस्तार अधिकारी पंचायत दीपक इंगळे, ग्रामसेवक राहीत हीमंतराव राठोड, ग्रामसेवक रामकृष्ण खिल्लारे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

# शिक्षकांची निवडणूक व जनगणना कामावर नियुक्ती

- विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी गरज व्यक्त
- 'शिक्षक भारती'चे अकोला जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १९ जून

**अकोला :** मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम आणि आगामी जनगणनेच्या कामासाठी अशासकीय अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांची बीएलओ व प्रगणक म्हणून मोठ्या प्रमाणावर नियुक्ती करण्यात येत आहे.

मात्र, यामुळे शाळांमधील शैक्षणिक कामकाजावर विपरीत परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, 'शिक्षक भारती' संघटनेच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे आधीच रिक्त आहेत. त्यातच १०० टक्के कर्मचाऱ्यांची नियुक्ती अशा राष्ट्रीय कामांसाठी केल्यास शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे शाळांमधील शैक्षणिक



कामकाज पूर्णपणे बंद पडेल. नवीन शैक्षणिक सत्र ३० जून २०२६ पासून सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांचे हित जोपासणे गरजेचे आहे. मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत शिक्षकांची नियुक्ती करताना शाळेतील कार्यरत कर्मचारी संख्या विचारात घेऊन एक निश्चित व प्रमाणबद्ध धोरण ठरवावे, जेणेकरून शाळा सुळीतपणे सुरू राहतील. ज्या शिक्षकांनी वयाची ५५ वर्षे पूर्ण केली आहेत, तसेच जे हृदयविकार, कॅन्सर, मधुमेह यांसारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त आहेत, त्यांना या कामातून तातडीने वगळण्यात यावे. संबंधित विभागाकडून शिक्षकांना परस्पर नियुक्ती आदेश देणे थांबवावे. बीएलओ किंवा एसआयआर चे कर्तव्य बजावल्यानंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना प्रशासनाकडून प्रमाणपत्र देण्यात यावे, जेणेकरून त्याची नोंद त्यांच्या सर्व्हिस बुकमध्ये (सेवा पुस्तिका) करणे सोयीचे होईल. या निवेदनावर शिक्षक भारतीचे विभागीय अध्यक्ष (अमरावती विभाग) सुरेश बाबुराव देवकर, जिल्हाध्यक्ष मनोज देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील अनेक शिक्षक प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष मनोज देशमुख, प्रेमेंद्र जंजाळे, विजय वाळसे, प्रिया सुळोकार, निलेश ढाकरे, सुरेश तायडे, रामकृष्ण नागमोते, सुनील आठवले, प्रिया म्हात्रे, शशिरेखा पारिका, पायल श्रावगी, अलका मुंढे, किरण राठोड, जयश्री नवलकार, शैलेश देशमुख, प्रकाश नवलकार, अर्चना रंजनकर, आनंद वाघमारे, मृणाल महाजन, अनुजा सराफ, विनोद सावजी, कांचन लाठी, माणिक रानडे दिप्ती सावजी, विनोद रावजी, प्रशांत घुगे आदी उपस्थित होते.

## मराठा सेवा संघ व राष्ट्रीय स्मारक समितीतर्फे राजमाता जिजाऊ स्मृती दिन साजरा

वि. प्रतिनिधी १९ जून

**आकोट :** 'राजमाता जिजाऊंनी केवळ छत्रपती शिवाजी महाराजांना घडवले नाही, तर अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ आणि स्वराज्याचे स्वप्न दिले. त्या खऱ्या अर्थाने स्वराज्याच्या प्रेरिका आहेत. त्यांच्या अभूतपूर्व त्यागाला आणि विचारांना त्रिवार वंदन करताना प्रत्येक नागरिकाच्या मनात राष्ट्रप्रेमाची ज्योत प्रज्वलित होते,' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्मारक समितीचे विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष पुरुषोत्तम चौखंडे यांनी केले.

मराठा सेवा संघ, आकोट आणि राष्ट्रीय स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ माँ साहेब स्मृती दिन सोहळा नुकताच भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून पुरुषोत्तम चौखंडे बोलत होते. त्यांनी शिवछत्रपतींचा



प्रेरणादायी इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी राष्ट्रीय स्मारक समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवश्री मुकुंदराव गावंडे होते. प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवश्री राममूर्ती वालसिंगे यांनी केले.

यावेळी राष्ट्रीय स्मारक समितीचे विश्वस्त अरुणराव जवंजाळ, चरणसिंग ठाकूर, बंडू पाटील कुलट, श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे विश्वस्त नंदकिशोर हिंगणकर, किसान ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष प्रा. वाल्मिक भगत, जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षा शिवमती लताताई चिकटे, शहराध्यक्षा शिवमती भैरवी हिंगणकर, ॲड. अतुल सोनखासकर, नागोराव कुलट, उद्धवराव टापरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

तसेच अंकीता पांडे, स्मिताताई महल्ले, शोभाताई म्हैसणे, जयश्री फोकमारे, डी.ओ. म्हैसणे, अविनाश डिक्कर, डॉ. गणेश इंगळे, दीपक वानखडे, रमेश शेंडे, प्रवीण वानखडे, विवेक बोचे, रामदास मंगळे, महेंद्र शेलकर, अनिल चौधरी, विजय वानखडे, रंगराव मिसळे, गणेश हिवरे यांच्यासह मराठा सेवा संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि

## शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तत्काळ राजीनामा द्यावा - काँग्रेसची मागणी



प्रतिनिधी १९ जून

**अकोला :** स्थानिक जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन माजी उपमहापौर निखीलेश दिवेकर यांनी केले. नीट पेपर फुटी मुळे नऊ विद्यार्थ्यांनी देशभरात आत्महत्या केली असून लाखो विद्यार्थ्यांना याचा मानसिक त्रास सहन करावा लागला. तरी शिक्षण मंत्री या भ्रष्टाचारात शामिल असल्याने, त्यांचा राजीनामा पंतप्रधान मोदी यांनी घ्यावा अशी मागणी यावेळेस करण्यात आली. त्याचबरोबर हा गुन्हा भाजपची सरकार असलेल्या राज्यातच होतो हे विशेष जसे महाराष्ट्र उत्तर प्रदेश मध्य प्रदेश बिहार इत्यादी असे मनोगत अनेक पदाधिकाऱ्यांना व्यक्त केले. सदर आंदोलनामध्ये माजी जिल्हाध्यक्ष अशोक अमाणकर, प्रशांत गावंडे, नगरसेवक आजाद खान, सरदार खान, माजी नगरसेवक राजेश मते, कपिल रावदेव, माजी नगरसेवक मोहम्मद नौशाद, सुनील चंदनबटवे, विनोद नालट, राजेश जेरपोतले, दत्ता देशमुख, मनीष मिश्रा, रहमान बाबू, आकोश सायखेडे, गणेश टाले, पद्माकर वासनिक, सखावत शहा, राजकुमार परदेसी, जनार्दन बुटे, मिलिंद पवार, महादेव मेहेंगे, गणेश धोत्रे, विठ्ठल नाकट, तेजस वानखडे, अरुण दंदी, इस्त्रार शहा, शेख नदीम इत्यादी उपस्थित होते.

### मोदींना सात जन्म घ्यावे लागेल - निखिलेश दिवेकर

नुकतेच मोदींनी नेहरू पेक्षा जास्त कार्यकाळ पूर्ण केला म्हणून भाजप तर्फे जल्लोष होत आहे. परंतु वास्तविक स्थिती खूप वेगळी आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशाची फाळणी झाली होती. आपल्या देशात खूप गरीबी व निरक्षरता होती. अशा स्थितीत त्यांनी सुरू केलेले उपक्रम - I.I.T., IIM, AIIMS, भिलाई, रूरकेला व दुर्गापूर येथील स्टील प्लांट. भाकरा नांगल, हिराकुंड व नागार्जुन धरण DRDO, BHEL अणुऊर्जा कमिशन, IOCL इत्यादी. या तुलनेत नरेंद्र मोदी यांनी एकही नवीन सरकारी संस्था सुरू केलेली नाही, उलट जुन्या सरकारी संस्था अदानी व अंबानी यांना विकायला काढल्या. याउलट नरेंद्र मोदी हे फक्त गोमूत्र व शेणाचे फायदे सांगतात व गणपती प्लास्टिक सर्जरी चा उत्तम नमुना आहे असेही सांगतात.

## निगेटिव्ह रक्त गटाच्या रक्तदात्यांनी करावे नियमित रक्तदान

**अकोला :** उन्हाळा संपला पण, रक्तदात्यांचा रक्तदानासाठीचा पुढाकार दिसून येत नसल्याचे चित्र आहे. इतकेच काय तर रक्तदान शिबिराशिवाय रक्त उपलब्ध होताना दिसत नसल्याचे चित्र आहे. अकोला स्त्री रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पुरेसा रक्तसाठा उपलब्ध; मात्र दुर्मिळ रक्तगटाच्या नागरिकांना रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अकोला येथील शासकीय स्त्री रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (जीएमसी) रक्तपेढीमध्ये सध्या पुरेशा प्रमाणात रक्तसाठा उपलब्ध असून रक्ताची कोणतीही टंचाई नसल्याची माहिती आरोग्य प्रशासनाकडून देण्यात आली आहे. स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवार यांनी सांगितले की, २२५ महिला रुग्ण दाखल आहेत.

## अकोला जिल्हा प्रशिक्षण केंद्राच्या बॉक्सिंगपटूंना राज्य अजिंक्यपद स्पर्धेत ३१ पदके प्राप्त



प्रतिनिधी १९ जून

**अकोला :** ११ ते १५ जून २०२६ दरम्यान पाळधी, जळगाव येथे आयोजित १ ली कब क्लास, कॅडेट व सब-ज्युनिअर मुला-मुलींच्या राज्य अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत अकोला जिल्ह्याच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण ७ सुवर्ण, १० रजत आणि १४ कांस्य पदकांची कमाई केली.

सब-ज्युनिअर मुली गटात स्वराली वानखेडे (४९-५२ कि.ग्रॅ.) व मनस्वी सावंग (६१-६४ कि.ग्रॅ.) यांनी सुवर्ण पदके जिंकली. त्रिशा पटके (४६-४९ कि.ग्रॅ.) हिने रजत तर परिधी तायडे (३५-३७ कि.ग्रॅ.) हिने कांस्य पदक मिळविले. सब-ज्युनिअर मुलांच्या गटात रुद्र पानकर (३०-३३ कि.ग्रॅ.) याने सुवर्ण पदक पटकावले. अंश धकाते (३७-४० कि.ग्रॅ.), अरहम अली खान (४०-४३ कि.ग्रॅ.), अथर्व गवई (५२-५५ कि.ग्रॅ.), सार्थक अंभोरे (५८-६१ कि.ग्रॅ.) व शौर्य खाडे (६४-६७ कि.ग्रॅ.) यांनी रजत पदके जिंकली. अजमल निमसूरवाले, मयंक पवार, आर्यन घुसले, शादाब रेगीवाले व आदर्श खारोडे यांनी कांस्य पदके मिळविली. कॅडेट मुली गटात निहारिका गनवीर हिने सुवर्ण पदक जिंकले, तर रसिका झांबरे, अवनी ठोसर व सेलिना चव्हाण यांनी कांस्य पदके मिळविली. कॅडेट मुलांच्या गटात संम्यक वाहूरवाघ (३०-३२ कि.ग्रॅ.), शिबान खान (३२-३४ कि.ग्रॅ.) व हर्ष बनसोड (४२-४४ कि.ग्रॅ.) यांनी सुवर्ण पदके जिंकली. यश काटकर (३४-३६ कि.ग्रॅ.) याने रजत पदक तर सक्षम संद्री, सय्यद सकलेन, मोईन खान आणि अंगत पटके यांनी कांस्य पदके प्राप्त केली. कब क्लास मुलांच्या गटात अद्वैत वानखेडे (२२ कि.ग्रॅ. पर्यंत), हर्ष यादव (२६-२८ कि.ग्रॅ.) आणि सिद्धेश वानखेडे (३४-३६ कि.ग्रॅ.) यांनी रजत पदके मिळविली.

## अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे राजमाता जिजाऊ यांना अभिवादन




प्रतिनिधी १९ जून

**अकोला :** अ. भा. मराठा महासंघ अकोला महानगर शाखेच्या वतीने राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार यांचे हस्ते हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

जुने अकोट स्टँड स्थित महानगर शाखेच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात विभागीय उपाध्यक्ष योगेश थोरात, महानगर अध्यक्ष श्रीकांत सरोदे, महिला विभागीय अध्यक्ष कल्पनाताई बिडवे उपाध्यक्ष माधुरीताई वाघमारे, महिला जिल्हाध्यक्ष सिंधुताई पवार, अनिता गावंडे, विजया देशमुख, अमरावती जिल्हा संपर्कप्रमुख काशिनाथ पटेकर, अकोला महानगर काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र गवई, महानगर उपाध्यक्ष राजेश देशमुख, सरचिटणीस प्रदीप लुगडे, प्रशांत माळी, प्रवीण कदम नरेश सूर्यवंशी, कामगार आघाडीचे विक्रांत वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पंढरपूर वारीसाठी रस्ते दुरुस्ती व वारकऱ्यांना सुविधा द्या : गणेश महाराज शेटे

### परिसरातून २० जून पासून पायीवारी दिंड्याचे प्रस्थान

प्रतिनिधी १९ जून

**अकोट :** आगामी आषाढी शुद्ध एकादशी सोहळ्यानिमित्त पंढरपूर येथे जाणाऱ्या वारकरी भाविकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी पायदळ वारी करणाऱ्या दिंड्या व पालखी मार्गांची तातडीने दुरुस्ती करावी, तसेच वाहतूक, आरोग्य, सुरक्षा आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी विश्व वारकरी सेनेचे राज्याध्यक्ष तथा योग योगेश्वर संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. गणेश महाराज शेटे यांनी केली आहे.

आषाढी एकादशीनिमित्त अमरावती विभागातून मोठ्या प्रमाणावर पायदळ वारी दिंड्या अकोट–अकोला–शेगाव मार्गे पंढरपूरकडे प्रस्थान करतात. दिंड्यांच्या मार्गक्रमणादरम्यान



रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. विविध गावांमधील भाविक रस्त्यावर व फाट्यांवर पालखीचे पूजन करून वारकऱ्यांचे स्वागत करतात. भक्तिमय वातावरणात वारकरी दिंड्यांमध्ये सहभागी होतात.

यंदा अकोट परिसरातून २० जूनपासून मोठ्या प्रमाणावर पायदळ दिंड्यांचे प्रस्थान होणार आहे. मात्र अकोट ते देवरी फाटा दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली काटेरी झाडे व झुडपे वारकऱ्यांसाठी अडचणीची ठरत आहेत. ही झाडे-झुडपे तातडीने हटवून मार्ग सुरक्षित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच अकोला मार्गावर सावली व विश्रांतीची पुरेशी व्यवस्था नसल्याने लोकप्रतिनिधी व प्रशासनाने तात्पुरती विश्रामस्थळे, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच आरोग्य पथके उपलब्ध करून द्यावीत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पंढरपूर वारीप्रमाणेच दर गुरुवारी शेगाव येथेही मोठ्या संख्येने भाविक पायदळ तसेच वाहनाने दर्शनासाठी जात असतात. मात्र शेगाव मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत.

# हिवरखेडमध्ये सक्तीने स्मार्ट मीटर बसवण्यात येणार नाही

### हिवरखेड विचार मंचच्या आंदोलनास यश

प्रतिनिधी १९ जून

**हिवरखेड :** हिवरखेड विचार मंच व समस्त नागरिकांच्या वतीने महावितरणच्या हिवरखेड कार्यालयात स्मार्ट मीटर योजना व नियमित वीजपुरवठ्याबाबत सहाय्यक अभियत्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात हिवरखेड परिसरात स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती तात्काळ थांबवावी, स्मार्ट मीटरमुळे नागरिकांची होणारी आर्थिक पिळवणूक रोखावी तसेच गाव व परिसरातील वीजपुरवठ्याच्या विविध समस्या सोडवाव्यात,



अशी मागणी करण्यात आली. तसेच शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी नियमित, अखंडित व पुरेशा दाबासह वीजपुरवठा देणे, वारंवार होणारी वीजखंडिती थांबविणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करणे, अशा विविध मागण्याही करण्यात आल्या.

यावेळी महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता धनंजय मिसाळ व सहाय्यक अभियंता . धांडे यांनी नागरिकांशी संवाद साधत स्मार्ट मीटर संदर्भातील भावना जाणून घेतल्या.

तसेच यापुढे शहरात स्मार्ट मीटरची सक्ती केली जाणार नाही, अशी ग्वाही दिली.

नागरिकांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या या निवेदनामुळे परिसरातील वीजग्राहकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे... या पुढे कुठल्या ग्राहकांचे सक्तीने स्मार्ट मिटर बसवण्याचा प्रयत्न केल्यास तात्काळ त्याला विरोध करून स्मार्ट मिटर बसवण्यास मनाई करावी व तसे पत्र महावितरण ला देण्यात यावे असे आवाहन हिवरखेड विचार मंच च्या वतीने करण्यात आले आहे.

ग्राहकांना स्मार्ट मीटरचा काहीच उपयोग नाही. कालावधी होण्याआधीच मीटर बंद पडते यांचा उपयोग फक्त हा कंपनीलाच आहे, आम्हाला नको हे स्मार्ट मीटर.

**तुषार गावंडे,** हिवरखेड

.........

ग्राहकांवर कुठल्याच प्रकाराची सक्ती केली जाणार नाही. विचारपूस करूनच मीटर लावण्यात येईल आणि या मीटरचे फायदे पण सांगू.

**धनंजय मिसाळ,**
अतिरिक्त कार्यकारी
अभियंता महावितरण (अकोट)

## शिक्षकांसाठी अभिनव प्रशिक्षण कार्यशाळा 'जिंदगी का सफर' संगीत मैफिलीतून संदेश

प्रतिनिधी १९ जून

**अकोट :** स्थानिक सेंट पॉल्स अकॅडमी सभागृहात शिक्षकांसाठी एक दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यशाळा आणि सांस्कृतिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या नाविन्यपूर्ण उपक्रमात परिसरातील शेकडो शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

?या संपूर्ण प्रशिक्षण सत्राचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे व्यावसायिक ताणतणाव व्यवस्थापन आणि जीवन मूल्यांवर आधारित 'जिंदगी का सफर' हा विशेष प्रबोधनात्मक संगीत कार्यक्रम! चंद्रकांत तिवारी यांनी आपल्या अमोघ वक्तृत्वाने आणि सुमधुर गायनाने संपूर्ण सभागृहाला मंत्रमुग्ध केले. चंद्रकांत तिवारी यांनी आपल्या २५ वर्षांच्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाचा संदर्भ देत, शिक्षकी पेशातील वाढता ताण, व्यवस्थापन आणि शिक्षक यांच्यातील समन्वय, आणि सकारात्मक जीवनशैली यावर अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. केवळ



कोरडे भाषण न देता, त्यांनी किशोर कुमार यांच्या अजरामर गीतांचा आधार घेत अत्यंत सुश्राव्य संगीतमय सादरीकरण केले. 'मुसाफिर हूँ यारों', 'ये जीवन है' आणि 'ओ पालनहारे' यांसारख्या गीतांमधून त्यांनी उपस्थित शिक्षकांना जीवनाचा खरा अर्थ समजावून सांगितला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात झालेल्या अभंग आणि भजन जुगलबंदीवर (जॅमिंग) संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटात झुलू लागले.

# ठाकरेंना पुन्हा झटका, बीएमसी नगरसेवकांची संख्या घटली

प्रतिनिधी १९ जून




**मुंबई :** मुंबई महापालिकेत शिवसेना (उबाठा) पक्षाला मोठा धक्का बसला आहे. भांडुपमधील प्रभाग क्रमांक १११ चे 'उबाठा'चे नगरसेवक दीपक सावंत यांचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द झाले होते. बनावट प्रमाणपत्र सादर केल्यामुळे महापालिका सभागृहात त्यांचे पद रद्द करत असल्याची घोषणा महापौर रितू तावडे यांनी गुरुवारी केली. त्यामुळे दीपक सावंत यांना आपले पद गमवावे लागले आहे.

परिणामी, 'उबाठा'ची मुंबई महापालिकेतील नगरसेवक संख्या ६५ वरून ६४ वर घसरली आहे. अलीकडेच झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्ग यासाठी (ओबीसी) राखीव असलेल्या प्रभाग क्रमांक १११ मधून नगरसेवक बनलेले दीपक सावंत यांचे जात प्रमाणपत्र जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रत्नागिरी यांनी १५ जून रोजी अवैध ठरवले आहे. यानंतर त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्याची घोषणा ही नियमानुसार महापालिकेत करावी लागते. त्यानुसार गुरुवारी महापालिका सभागृहात याची घोषणा महापौरांनी केली. त्यामुळे शिवसेना (उबाठा) पक्षाच्या नगरसेवकांचे संख्याबळ एकने कमी झाले आहे.

दीपक सावंत यांनी निवडणूक लढवलेल्या प्रभागात भाजपच्या उमेदवार सारिका पवार दुसऱ्या क्रमांकावर होत्या. त्यांनी सावंत यांच्याविरोधात लघुवाद न्यायालयात खटला दाखल केला होता. हे प्रकरण न्यायालयात आहे, मात्र त्यांना अपात्र करावे आणि दुसऱ्या क्रमांकाची उमेदवार म्हणून आपली निवड व्हावी, अशी मागणी त्यांनी न्यायालयाकडेही केली आहे. सावंत यांचे पदच रद्द झाल्याचे घोषित झाल्याने सारिका पवार यांचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांना नगरसेविका म्हणून संधी मिळाल्यास भाजपचे संख्याबळ ८० होणार आहे.

यासंदर्भात सारिका पवार यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी हे न्यायालयीन प्रकरण असून, तूर्तास यावर काहीही बोलणार नाही, असे स्पष्ट केले. मुंबई महापालिकेच्या इतिहासात जातीचे बनावट पत्र सादर करून निवडणूक लढविणाऱ्या डझनाहून अधिक नगरसेवकांनी आपले पद गमावले आहे.

दीपक सावंत यांचे नगरसेवकपद रद्द करण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले नसल्याचे सांगत विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी महापालिका सभागृहात विरोध दर्शविण्याचा प्रयत्न केला. तसेच, सभागृहात घोषणेची एवढी घाई का केली जाते, असा प्रश्न केला. जात पडताळणीसाठी सहा महिन्यांची मुदत दिल्याचेही पेडणेकर यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत नागरिकांचा मागासवर्गीय प्रवर्गासाठी (ओबीसी) राखीव गोवंडी एम-पूर्व विभागातील १३७ प्रभागातून निवडून आलेले 'एमआयएम'चे नगरसेवक शमीर रमजान पटेल यांचे जात प्रमाणपत्र अहिल्यानगर जिल्हा जात पडताळणी समितीने अवैध ठरल्यामुळे त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्याची घोषणा सभागृहात होणार होती.

परंतु न्यायालयाने पटेल यांचे पद रद्द करण्यास स्थगिती दिल्याने त्यांचे पद तूर्तास वाचले आहे.

# मुंबईहून 48 मिनिटांत पोहचा पुण्याला बुलेट ट्रेन प्रकल्पाची रेल्वे मंत्र्यांची घोषणा



प्रतिनिधी १९ जून

**मुंबई:** मुंबई-पुणे बुलेट ट्रेन प्रकल्पाद्वारे दोन्ही शहरांमधील १७० किलोमीटरचे अंतर अवघ्या ४८ मिनिटांत पूर्ण होणार आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या घोषणेनुसार, हा हाय-स्पीड कॉरिडोअर भारत स्वतः विकसित करणार असून, या प्रकल्पाच्या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे.

प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे प्रवासाला वेळ केवळ ४८ मिनिटे लागतील. अंतर सुमारे १७० किमी आहे. तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण करत भारत स्वतः ही बुलेट ट्रेन उभारणार आहे. हा मार्ग पुढे हैदराबादपर्यंत जोडला जाण्याची शक्यता आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी महाराष्ट्राच्या विकासाबाबत गौरवोद्गार काढले.

तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पक नेतृत्वाची त्यांनी प्रशंसा केली.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये औद्योगिक व कामगार न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी जमीन मंजूर




**मुंबई:** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील न्यायव्यवस्थेची पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगरमधील गारखेडा येथील १.१६ हेक्टर आर इतकी शासकीय जमीन औद्योगिक व कामगार न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी आणि न्यायिक अधिकाऱ्यांच्या निवास स्थानांसाठी उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली आहे. यामुळे आगामी काळात या कामाला वेग येईल.

औद्योगिक व कामगार न्यायालयासाठी जमीन उपलब्ध व्हावी अशी मागणी केली जात होती. परंतु महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भात निर्णय घेतला. त्यामुळे मंजूर झालेल्या जागेवर प्रशस्त इमारत उभी राहील. ही प्रक्रिया आता वेग घेईल असा विश्वास देखील व्यक्त केला जातो आहे. संबंधितांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# मुंबईचे तलाव आटले, बांधकामे थांबली 1.43 लाख घरांचे प्रकल्प रखडणार

प्रतिनिधी १९ जून



**मुंबई :** मुंबईतील तीव्र होत चाललेल्या पाणीटंचाईमुळे महानगरपालिकेने लागू केलेल्या निर्बंधांचा मोठा फटका शहरातील गृहनिर्माण क्षेत्राला बसण्याची शक्यता आहे. पाणीपुरवठ्यावरील निर्बंधांमुळे सध्या बांधकाम सुरू असलेल्या सुमारे १ लाख ४३ घरांच्या प्रकल्पांच्या पूर्णत्वाच्या वेळापत्रकावर परिणाम होण्याची भीती आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांतील पाणीसाठा घसरून केवळ १०.३५ टक्क्यांवर आला आहे. मान्सूनच्या विलंबामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी पालिकेने बांधकाम प्रकल्पांना दिला जाणारा पाणीपुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच नव्या बांधकाम प्रकल्पांना पाणी जोडण्या देण्यासही स्थगिती देण्यात आली. त्याचा परिणाम दिसून येणार आहे.

रिअल इस्टेट क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, अनेक बांधकाम प्रकल्प पाण्यासाठी टँकरवर अवलंबून असले तरी पाणीटंचाई आणि पूर्वी झालेल्या टँकर समस्यांमुळे खर्चात वाढ होऊ शकते. परिणामी प्रकल्पांचा खर्च वाढण्याबरोबरच घरांच्या ताब्यात विलंब होऊ शकतो. दरम्यान, मुंबईत जून महिन्यातील पाऊस गेल्या १२ वर्षांतील सर्वात कमी नोंदला गेला आहे. सध्या शहराकडे अवघ्या ४० दिवस पुरेल इतकाच पाणीसाठा शिल्लक असल्याने प्रशासनाने कठोर जलसंवर्धन उपाययोजना लागू केल्या आहेत. मुंबई महानगर क्षेत्रात सुमारे १ लाख ४३ लाख घरे बांधकामाधीन आहेत. पाणीपुरवठा बंद झाल्यामुळे काँक्रीटिंग, प्लास्टरिंग, क्युरिंग आणि इतर बांधकाम प्रक्रिया प्रभावित होऊ शकतात.

## डोंबिवलीकरांना मिळणार दोन नवे जलमार्ग!

**कल्याण :** वाहतूककोंडीवर पर्याय म्हणून डोंबिवली-ठाणे-मीरा भाईंदर- वसई आणि दुसऱ्या मार्गाने डोंबिवली, दिवा ते नवी मुंबई विमानतळ असे दोन जलमार्ग निश्चित करण्यात आले आहेत. त्यासाठी डोंबिवली मोठागाव येथे सुरू असलेले जेट्टीचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे.

ठाणे पुढील स्थानकातील प्रवाशांचा वाढता भार आणि त्यामानाने अपुऱ्या लोकलफेऱ्या यामुळे होणाऱ्या गर्दीतून रोज जीवघेणा प्रवास करावा लागतो. लोकलच्या दारात लटकत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जीव गमवावा लागत आहे. यावर पर्याय म्हणून भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मेरीटाइम विभागाचे मंत्री असताना जलवाहतुकीचा मुद्दा मांडला होता. मुंबई ते कोकण आणि ठाणे पुढील शहरांसाठी जलवाहतूक करण्याबाबत पर्यायाची चाचपणी सुरू करत डोंबिवलीतून जलवाहतूक सुरू करण्यासाठी काम सुरू असल्याचे सांगितले होते. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर वॉटर टॅक्सी हा प्रवासाचा सुखद आणि जलद पर्याय असून त्यावर काम सुरू असल्याचे सांगितले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमातील मुख्य मुद्दा असलेल्या वॉटर टॅक्सीचा पर्याय वाहतुकीसाठी उपलब्ध होईल, असा विश्वास नगरसेवक दीपेश म्हात्रे यांनी व्यक्त केला आहे.

# मुंबईकरांसाठी गुड न्यूज ! समुद्रात भराव टाकणार

प्रतिनिधी १९ जून

**मुंबई :** मुंबईतील ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह भुयारी मार्ग प्रकल्पासाठी मरिन ड्राइव्ह परिसरात समुद्रात भराव टाकून नवीन प्रॉमेनेड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामासाठी सुमारे ४० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यासाठी आवश्यक पर्यावरणीय मंजुरी मिळविण्याची प्रक्रिया एमएमआरडीएकडून सुरू करण्यात आली आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत मरिन ड्राइव्ह येथील जवाहर बालभवन परिसरात रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह भुयारी मार्गासाठी येथे प्रवेश आणि निर्गमन रॅम्प उभारण्यात येणार असल्याने विद्यमान रस्ता अरुंद होण्याची

♦ १३ मार्गिकांचा रस्ता होणार, असा आहे प्लॅन



शक्यता आहे. त्यामुळे भविष्यातील वाहतूककोंडी टाळण्यासाठी जवळपास ३०० मीटर लांबीच्या रस्त्याचा विस्तार करून दोन्ही बाजूंच्या वाहतुकीसाठी एकूण १३ मार्गिकांचा रस्ता विकसित करण्याचा प्रस्ताव आहे.

सध्या जवाहर बालभवन परिसरात दोन्ही दिशांना प्रत्येकी ४ मार्गिका असून एकूण ८ मार्गिकांची व्यवस्था आहे. मात्र भुयारी मार्गाचे रॅम्प तयार झाल्यानंतर वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेऊन रस्त्याची रचना बदलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्तावित आराखड्यानुसार ३-३-३-४ अशा स्वरूपात एकूण १३ मार्गिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

या विस्तारामुळे विद्यमान प्रॉमेनेडचा काही भाग बाधित होणार असल्याने समुद्रात सुमारे २,२९८ चौरस मीटर क्षेत्रावर भराव टाकून नवीन प्रॉमेनेड उभारण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबईकरांना मरिन ड्राइव्हच्या प्रॉमेनेडचा आनंद पूर्वीप्रमाणेच घेता येईल.

नवीन आराखड्यानुसार नरिमन पॉईंटच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांसाठी ३ मार्गिका, ऑरेंज गेटकडून बोगद्यातून बाहेर पडणाऱ्या वाहनांसाठी ३ मार्गिका, ईस्टर्न फ्रीवेकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी ३ मार्गिका आणि गिरगावच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांसाठी ४ मार्गिका उपलब्ध असतील.

या प्रकल्पामुळे दक्षिण मुंबईतील वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुंबईत मध्यरात्री दुर्दैवी दुर्घटना ; काँक्रीटचा तुकडा कोसळल्याने एकाचा मृत्यू

प्रतिनिधी १९ जून



**मुंबई :** मुंबईतील जुन्या आणि उंच इमारतींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. चेंबूर-चुनाभट्टी परिसरात शुक्रवारी पहाटे घडलेल्या एका दुर्दैवी दुर्घटनेत ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. १७ मजली निवासी इमारतीच्या टेरेसवरील पॅरापेट भिंतीचा काँक्रीट व प्लास्टरचा भाग अचानक कोसळून खाली रस्त्यावरून जाणाऱ्या व्यक्तीच्या अंगावर पडल्याने ही दुर्घटना घडली. मृत व्यक्तीचे नाव अब्दुल वहाब असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.


बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना चुनाभट्टीतील कुरेशी नगर, उमरवाडी परिसरातील गॅलेक्सी अपार्टमेंट या १७ मजली निवासी इमारतीत गुरुवारी रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास घडली. इमारतीच्या टेरेसवरील पॅरापेट भिंतीचा प्लास्टर आणि काँक्रीटचा काही भाग अचानक तुटून खाली पडला. त्याचवेळी इमारतीखालून जात असलेल्या अब्दुल वहाब यांच्या डोक्यावर आणि शरीरावर हा ढिगारा कोसळला.

अपघातानंतर परिसरातील नागरिक आणि प्रत्यक्षदर्शींनी तात्काळ धाव घेत जखमी अवस्थेतील अब्दुल वहाब यांना खासगी वाहनातून सायन येथील लोकमान्य टिळक महापालिका रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना ब्रॉट डेड घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल, पोलीस, रुग्णवाहिका सेवा, तसेच पालिकेच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पाहणीदरम्यान अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना पॅरापेट भिंतीचा आणखी एक भाग धोकादायक स्थितीत लटकलेला आढळला. हा भाग कधीही कोसळू शकत असल्याने अग्निशमन दलाने तो खाली उतरवला. अधिक धोका टाळण्यासाठी इमारतीभोवतीचा परिसर तात्पुरता बंद करण्यात आला. नागरिक आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी परिसरात बॅरिकेड्स लावण्यात आले आहे. भिंतीचा भाग नेमका कोणत्या कारणामुळे कोसळला, याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. इमारतीची रचना, बांधकामाची स्थिती यांची तपासणी करण्याची प्रक्रिया आता सुरू होणार आहे.

# मुंबईसह महाराष्ट्रात मुसळधार पाऊस पडणार हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांचा अंदाज

प्रतिनिधी १९ जून



**मुंबई :** राज्यात आगामी काळात मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. येत्या २१ ते ३० जून या काळात राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता आहे. हा पाऊस पेरणीयोग्य असा असणार आहे, असा दावा पंजाबराव डख यांनी केला आहे.

राज्यात मान्सून दाखल झाला असला तरी अपेक्षित पाऊस पडताना दिसत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पाऊस पडत नसल्यामुळे प्रशासनासह सरकारची देखील चिंता वाढली आहे. पाऊस पडत नसल्यामुळे धरणांमधील पाणीसाठाचा विचार करता अनेक शहरांमध्ये पाणीकपातीचा निर्णय घेण्यात आला आहे. हवामान विभागाकडून पावसाबाबत वेगवेगळे अंदाज वर्तवले जात आहेत. राज्यात आगामी काळात लवकरच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. अल-निनोच्या संकटामुळे यंदा राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडणार असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी एक खुशखबर दिली आहे. राज्यात २१ ते ३० जून या काळात चांगला पाऊस पडणार असल्याची माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे.

'येत्या २१ जून ते ३० जूनच्या दरम्यान राज्यात पावसाचं वातावरण तयार होणार आहे. येत्या २१ तारखेपासून अनेक ठिकाणी पाऊस पडायला सुरुवात होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. दररोज वेगवेगळ्या ठिकाणी पाऊस पडेल आणि पेरणीयोग्य असा हा पाऊस असेल', अशी माहिती पंजाबराव डख म्हणाले.

'विदर्भात सर्वात आधी पावसाला सुरुवात होईल. वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती या जिल्ह्यांमध्ये आधी पाऊस येईल. त्यानंतर पश्चिम विदर्भात पाऊस येईल. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि त्यानंतर उत्तर महाराष्ट्रात पाऊस येईल. उत्तर महाराष्ट्रात २३ जून ते ३० जून या काळात चांगला पाऊस पडेल. यासोबतच मुंबईतही जूनच्या शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस पडेल. मुंबईत पहिलाच पाऊस हा मुसळधार स्वरुपाचा पाऊस पडेल. कोकण घाटमाथ्यावरही जूनच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस पडेल', असं पंजाबराव डख यांनी सांगितलं आहे.

'जूनमध्ये कमी पाऊस पडणार असल्याचं आधीपासून म्हटलं आहे. पण जुलैमध्ये जास्त पाऊस पडणार आहे. ऑगस्टमध्ये त्यापेक्षा कमी पाऊस होईल. पण सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये परतीचा पाऊस चांगला पडणार आहे. परतीचा पाऊस जास्त पडणार आहे. त्यामुळे रब्बीचं पीक जास्त येणार आहे', असा दावा पंजाबराव डख यांनी केलं आहे.

# मुंबई शेअर बाजार उघडताच गुंतवणूकदारांचे २ लाख कोटी फस्त!

प्रतिनिधी १९ जून

**मुंबई:** शुक्रवारी भारतीय शेअर बाजाराचे प्रमुख निर्देशांक घसरणीसह उघडले. बाजार सुरू होताना सेन्सेक्समध्ये ७०० हून अधिक अंशांची, तर निफ्टीमध्ये २०० अंशांची घसरण दिसून आली. यामुळे बीएसई सेन्सेक्समधील सर्व कंपन्यांचे एकूण मूल्य २ लाख रुपयांनी घसरून ४,७७, ६०,९०८ रुपयांवरून ४,७५, ६५, ७०८ रुपयांवर आले.

अॅक्सेंचरने कमाईची आकडेवारी जाहीर केली आहे. जी अपेक्षेपेक्षा खूप कमी असल्याने बाजारात ही कमजोरी

♦ एका कंपनीमुळे संपूर्ण बाजाराला फटका

दिसून आली. याचा आयटी क्षेत्रातील शेअर्सवर मोठा परिणाम झाला. आयटी क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या अॅक्सेंचरने त्रैमासिक विक्रीचा अंदाज वॉल स्ट्रीटच्या अपेक्षांपेक्षा कमी वर्तवल्यामुळे, शुक्रवारी निफ्टी आयटी निर्देशांकात ५.८ टक्क्यांची घसरण झाली. दरम्यान, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ५ पैशांनी कमकुवत होऊन ९४.३८ या पातळीवर उघडला, गुरुवारी रुपया ९४.३३ या पातळीवर बंद झाला होता. भारतीय आयटी शेअर्समध्ये आज मोठ्या प्रमाणावर विक्रीचा दबाव दिसून आला, ज्यामुळे निफ्टी आयटी निर्देशांकात ६ टक्क्यांहून अधिक घसरण झाली. अॅक्सेंचरने आपल्या महसूल वाढीचा अंदाज कमी केल्याने आणि मागणीतील अधोरेखित केल्याने ही परिस्थिती उद्भवली. या घडामोडींमुळे या क्षेत्राच्या भविष्याबाबत चिंता निर्माण झाली आहे. बाजारातील अस्थिरता दर्शवणारा निर्देशांक (ज्याला 'फिअर गेज' किंवा 'व्होलॅटिलिटी इंडेक्स' म्हटले जाते) सुमारे ६ टक्क्यांनी वाढून १३.३७ च्या पातळीवर पोहोचला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A3072, RRC Helpline No. 8484842135